आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२५

ठळक बातम्या

1. महाराष्ट्रात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण ठेवू नये असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश.
2. नागपूर विद्यापीठ आणि चंद्रपूरच्या चिचपल्ली बांबू संशोधन प्रशिक्षण केंद्रात बांबू कलाकुसर, कौशल्य आणि संशोधन शिक्षणासाठी सामंजस्य करार.
3. नागपूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये १३ डिसेंबरला 'राष्ट्रीय लोक अदालत'चे आयोजन.
4. सुप्रसिद्ध कवी, डॉ.मिर्झा रफी अहमद बेग याचं आज अमरावती इथं निधन, मुख्यमंत्र्यांनी केला शोक व्यक्त.

आरक्षणाची अधिसूचना

महाराष्ट्रात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची अधिसूचना जारी करू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगाला दिले. तसंच, ज्या निवडणुकांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची अधिसूचना जारी झालेली आहे, त्या निवडणुकांचा निकाल या याचिकांवरच्या निकालावर अवलंबून राहील, असंही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं स्पष्ट केलं. राज्यात एकंदर २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून यापैकी ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी न्यायालयाला दिली. तर, २९ महानगरपालिका आणि ३४६ पंचायत समित्यांच्या निवडणुका अद्याप जाहीर झाल्या नसल्याचंही त्यांनी सांगितलं. हे प्रकरण तीन न्यायमूर्तींच्या पीठाकडे सोपवून पुढची सुनावणी २१ जानेवारी रोजी घ्यायची सूचना न्यायालयानं केली आणि ज्यांची अधिसूचना जारी झालेली आहे, त्या निवडणुका वेळापत्रकाप्रमाणे घ्यायला परवानगी दिली. याशिवाय, उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अधिसूचना जारी करायचा मार्गही सर्वोच्च न्यायालयानं मोकळा केला, मात्र या सर्व निवडणुकांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडू नका, असे निर्देशही न्यायालयानं दिले. फक्त दोन

महानगरपालिकांमध्ये ही मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिल्यानंतर या निवडणुकांची अधिसूचना तातडीनं जारी करावी आणि निवडणूक कार्यक्रम राबवावा, असं न्यायालयानं सांगितलं.

<u>विजय वडेट्टीवार प्रतिक्रिया</u>
सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य निवडणुकांवर स्थगिती न देता प्रक्रिया सुरू ठेवण्याचे आदेश दिले असले तरी या निवडणुकांचा निकाल न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून ठेवण्यात आला आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अद्याप अनिश्चित राहिला असल्याची टीका काँग्रेसचे विधानमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. न्यायालयाने ५०% आरक्षण मर्यादा ओलांडू नये असे स्पष्ट निर्देश दिल्याने काही जागांवर निवडणूक होणार नसल्याचा दावा त्यांनी केला. भाजप सरकारने ओबीसींसाठी २७% आरक्षण दिल्याचे दावे फोल ठरले असून ओबीसी समाजाची दिशाभूल होत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

*जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकासुद्धा महानगर पालिकेच्या निवडणुका प्रोसेस सुरू करायला सांगितली. पण ते सांगताना 50 टक्केच आरक्षण याच ठिकाणी सुरू करा. अशा प्रकारचं मत नोंदवलं म्हणजे याचा अर्थ असा की महाराष्ट्रातील चौथी जिल्हा परिषदा पैकी 12 जिल्हा परिषदेच्या निवडणुका होऊ शकतील किंवा त्याच्या प्रोसेस होऊ शकेल.कारण इतर जिल्हा परिषदांमध्ये ते आरक्षण 50 टक्केच्यावर घेतला आहे.*

<u>मुख्यमंत्री वशिम सभा</u>
“वाशिमच्या परिवर्तनाचा संकल्प फक्त घोषणा नाही, तर आमच्याकडे नीतीही आहे, निधीही आहे आणि विकासाची नियतही,” असे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाशिममधील जाहीर सभेत केले. नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजित सभेत त्यांनी शहरांसाठी पाणीपुरवठा, भुयारी गटार, रस्ते आणि सांडपाणी व्यवस्थापनासह सर्व विकास आराखडे तयार झाल्याचे सांगितले.

<u>प्रफुल्ल गुडधे</u>
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीला आव्हान देणारी काँग्रेस उमेदवार प्रफुल्ल गुडधे यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. विजय बिष्णोई यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. यापूर्वी ही याचिका हायकोर्टानेही फेटाळली होती.

ईव्हीएमच्या वापराबाबत निवडणूक रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

<u>लोक अदालत</u>

सर्वोच्च न्यायालयाच्या राष्ट्रीय विधी सेवा समितीच्या निर्देशानुसार १३ डिसेंबर रोजी नागपूरसह जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या लोकअदालतीत प्रलंबित तसेच दाखलपूर्व तडजोडीची पात्र प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात नुकसानभरपाई, वैवाहिक वाद, बँका व वित्तीय संस्थांच्या वसुलीची प्रकरणे आदी वादांचा निपटारा आपसी तडजोडीने करण्यात येणार आहे. लोक अदालत प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क नसून दिलेल्या निवाड्यांविरुद्ध अपिलाची तरतूद नाही, त्यामुळे वाद कायमस्वरूपी मिटतो. पक्षकारांनी आपल्या प्रकरणांसाठी न्यायालयात अर्ज सादर करावा किंवा जिल्हा व तालुका विधी सेवा कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राधिकरणाचे सचिव प्रवीण उन्हाळे व जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष रोशन बागडे यांनी केले आहे.

<u>पंतप्रधान-गोवा</u>

विकसित भारतासाठीचा मार्ग लोकांच्या एकत्रित राहण्याने प्रशस्त होतो असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज गोवा इथ केलं. गोव्यामधील लोकांनी अनेक कठीण परिस्थितींना तोंड देऊन देखील आपली स्वतःची संस्कृती जपली आहे. गोव्यामधील श्री संस्थान गोकर्ण पार्थ गल्ली जीवोत्तम च्या पंच शत मनोत्सवात ते बोलत होते.

*विकसित भारत का रास्ता एकता से होकर जाता है। जब समाज जुड़ता है। जब हर क्षेत्र, हर वर्ग एक साथ खड़ा होता है तभी राष्ट्र बड़ी छलांग लगाता है। श्री संस्थान गोकर्ण परत गाली ज्योत मठ का प्रमुख उद्देश्य लोगों को जोड़ना, मन को जोड़ना, परंपरा और आधुनिकता के बीच सेतु बनना। इसलिए विकसित भारत की यात्रा में यह मठ एक प्रमुख प्रेरणा केंद्र की भूमिका में भी है।*

या संस्थेने मानवता आणि परंपरांची जपणूक यासाठी मोठं कार्य केल्याचं ते म्हणाले. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते 77 फूट उंचीचा प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचं  अनावरण करण्यात आलं यावेळी दहा हजार चौरस फूट परिसरात असलेल्या रामायण थीम पार्क आणि संग्रहालयाचे देखील उद्घाटन मोदींच्या हस्ते झालं.

संरक्षण परिसंवाद

जागतिक विचारमंथनाला दिशा देण्याचं काम आजचा भारत करत असून हिंद प्रशांत आणि ग्लोबल साऊथमधले देश एक विश्वासू भागीदार म्हणून भारताकडे पाहतात, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितलं. नवी दिल्लीत आयोजित यंदाच्या चाणक्य संरक्षण परिसंवादात ते आज बोलत होते. विस्तारत जाणारी आपली अर्थव्यवस्था, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रगती आणि तत्वनिष्ठ राजनैतिकतेसाठी दृढ वचनबद्धता यांनी आपल्याला समतोल, स्थिर आणि जबाब्दारीपूर्ण आवाज मिळवून दिला आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतानं नेहमीच शांतता आणि परस्पर संवादावर विश्वास ठेवला आहे, मात्र जेव्हा देशाच्या स्वायत्ततेचा आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उभा ठाकतो तेव्हा कोणतीही तडजोड केली जात नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

*When it comes to our sovereignty and the security of our people, we do not compromise. Our armed forces have shown again and again that they are capable and ready.*

सुरक्षित भारताशिवाय विकसित भारत अशक्य आहे आणि सशक्त भारताशिवाय सुरक्षित भारत अशक्य असल्याचं ते म्हणाले.

सामंजस्य करार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि चंद्रपूर येथील चिचपल्ली बांबू संशोधन प्रशिक्षण केंद्र यांच्यात बांबू कलाकुसर, कौशल्य आणि संशोधन शिक्षणासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना बांबूपासून हॅंडीक्राफ्ट, फर्निचर आणि इतर उत्पादनांच्या निर्मितीचे प्रशिक्षण तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आगामी काळात अल्पकालीन अभ्यासक्रमांसह बांबू कौशल्यावर आधारित पदविका आणि पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

डॉ.मिर्झा रफी अहमद बेग

सुप्रसिद्ध कवी, 'मिर्झा एक्सप्रेस' नावाने ओळखले जाणारे डॉ. मिर्झा रफी अहमद बेग याचं आज, अमरावती इथं निधन झालं, ते ६८ वर्षांचे होते. अनेक कवी संमेलनात त्यांनी आपल्या शैलीनं रसिकांमध्ये स्थान निर्माण केलं होते. 'मिर्झाजी कहीन' हा त्यांचा वर्तमानपत्रातील स्तंभ लोकप्रिय झाला होता. मिर्झा यांचे २० काव्यसंग्रह प्रसिद्ध असून मिर्झा एक्सप्रेस या नावाने अफलातून किस्से आणि कवितेचा कार्यक्रम प्रसिद्ध होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांनी त्यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. मिर्झा बेग यांच्या निधनानं एक उत्तम विनोदी लोककवी आणि सामाजिक जाण असलेलं व्यक्तिमत्व गमावल्याचं मुख्यमंत्र्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

इफ्फी समारोप

५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फीचा आज गोव्यातील पणजीत समारोप होत आहे. आजच्या समारोपाच्या एका कार्यक्रमात दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहण्यात येईल. २० नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या या महोत्सवात ८१ देशांतील २४० हून अधिक चित्रपट प्रदर्शित झाले, ज्यात जागतिक चित्रपटातील सर्वोत्तम चित्रपट प्रदर्शित झाले.

मुख्यमंत्री महाकरंडक

आमदार संदीप जोशी यांच्या श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट मोहगाव यांच्या वतीने आयोजित पहिल्या मुख्यमंत्री महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा समारोप काल झाला. ‘नामदेव पायरी’ या माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन बुलडाणा यांची एकांकिका प्रथम, तर ‘चाप्लीन स्माईल’ आणि ‘दी डार्क एज’ या एकांकिकांना अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळाला. तर ‘प्रेम की यातना’ आणि ‘राडा’ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार श्रीपाद अपराजित, शेफ विष्णू मनोहर आणि आमदार संदीप जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

हवामान

विदर्भात आज भंडारा इथं १० अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाचीबी नोंद झाली. नागपुरात आज १३.६ अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदविण्यात आलं.

******